# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः23.03.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- भारताचं देशांतर्गत उत्पादन गेल्या 10 वर्षांत 105 टक्के वाढीच्या दरानं दुप्पट
- अवैध ऑनलाईन गेमिंगशी संबंधित ३५७ संकेतस्थळं बंद
- कांद्याच्या निर्यातीवरचं २० टक्के शुल्क १ एप्रिलपासून मागे
- मतदारसंघाची पुनर्रचना करताना लोकसंख्या हा एकमेव निकष असू नये: नवीन पटनायक
- यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार छत्तीसगडचे हिंदी कवी - लेखक विनोद कुमार शुक्ल यांना जाहीर आणि
- जिम्नॅस्टिक्समध्ये, भारताच्या प्रणती नायकला FIG विश्वचषक स्पर्धेत कास्यपदक

**जीडीपी**

भारताचं देशांतर्गत उत्पादन गेल्या 10 वर्षांत 105 टक्के वाढीच्या दरानं दुप्पट झालं आहे. देशाचा जीडीपी २०१५ मध्ये दोन पूर्णांक एक ट्रिलियन डॉलरवरून 2025 मध्ये चार पूर्णांक 3 ट्रिलियन डॉलर झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं ही आकडेवारी जाहीर केली आहे. अमेरिका, चीन, जर्मनी आणि जपान नंतर जीडीपीच्या बाबतीत भारत आता जगातला पाचवा सर्वात मोठा देश बनला आहे. भारत लवकरच जपानलाही मागे टाकेल, असा अंदाज आहे.

**गेमिंग**

अवैध ऑनलाईन गेमिंगशी संबंधित 357 संकेतस्थळं वस्तू आणि सेवा कर विभागाच्या गुप्तचर यंत्रणेनं - डीजीजीआय ने - बंद केली आहेत. यातले 4 कोटी रुपये आणि दोन हजार बँक खातीही गोठवल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे. याशिवाय काही संकेतस्थळांवर आढळलेल्या UPI आयडीशी जोडलेली 392 बँक खातीही गोठवली असून या खात्यांमधले 122 कोटी रुपये जप्त करण्यात आले आहेत. ऑनलाईन गेमिंग उद्योगात देशातील परदेशातील चालकांचा समावेश आहे. अश्या सुमारे 700 संस्थांची चौकशी डीजीजीआय करत आहे. अश्या संस्थांनी नोंदणी न केल्याचं किंवा आपलं करपात्र उत्पन्न दडवून जीएसटी चुकवल्याचं निदर्शनास आलं आहे. दरम्यान आपलं वैयक्तिक आर्थिक नुकसान टाळण्यासाठी लोकांनी सावध राहावं आणि ऑनलाइन मनी गेमिंगमध्ये सहभागी होऊ नये असा सल्ला केंद्र सरकारनं दिला आहे.

**कांदा**

कांद्याच्या निर्यातीवर असलेलं 20 टक्के शुल्क केंद्र सरकारने १ एप्रिलपासून मागे घेतलं आहे. यामुळे शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेल आणि ग्राहकांनाही परवडणाऱ्या किंमतीत कांदा मिळू शकेल असं ग्राहक व्यवहार, अन्न आणि

सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे. बाजारपेठेत रब्बी पिकांची चांगली आवक अपेक्षित असल्याने किरकोळ किमतीत घट झाली आहे. रब्बी हंगामात कांद्यासह अन्य पिकांचंही मुबलक उत्पादन झाल्याने येत्या काही महिन्यांत बाजारभाव आणखी कमी होण्याची शक्यता आहे. देशात पुरेसा कांदा उपलब्ध व्हावा यासाठी 13 सप्टेंबर 2024 पासून कांद्यावर 20 टक्के निर्यात शुल्क लागू करण्यात आलं होतं.

**स्टालिन**

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेसंबंधी तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टालिन यांनी बोलावलेली संयुक्त कृती समितीची बैठक काल चेन्नईत झाली. 1971च्या जनगणनेवर आधारित मतदारसंघांची रचना आणखी 25 वर्षांसाठी कायम ठेवावी अशी मागणी बैठकीत करण्यात आली. ही मागणी करणारं संयुक्त निवेदन संसदेच्या चालू अधिवेशनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर करण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. मतदारसंघांच्या पुनर्रचनेची प्रक्रीया पारदर्शी, आणि सर्व राज्य सरकारं, राजकीय पक्ष आणि संबंधितांशी विचारविनिमय करुनच पुढे न्यावी असा ठराव या बैठकीत मंजूर झाला.
दरम्यान मतदारसंघाची पुनर्रचना करताना लोकसंख्या हा एकमेव निकष असू नये, तसंच यावर तपशीलवार चर्चा आणि विचारविनिमय करुनच पुढं गेलं पाहीजे असं ओडिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी म्हटलं आहे. पुनर्रचनेला विरोध नाही, तर पुनर्रचना न्याय्य व्हावी अशी आपली मागणी असल्याचं या बैठकीत स्टालिन म्हणाले. पुनर्रचना करताना देशाच्या विविधतेचं संरक्षण झालं पाहिजे अशी भूमिका केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी मांडली. कोणत्याही राज्यावर अन्याय होणार नाही अशा प्रकारे पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री Y S जगनमोहन रेड्डी यांनी केली आहे.
तमिळनाडूतले सध्याचे प्रश्न सोडवता येत नसल्याने मुख्यमंत्री स्टालिन हे केवळ नाटक करत असल्याचा आरोप तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष के अण्णामलाई केला आहे.

**निवडणूक आयोग**

राजकीय पक्षांसोबत सर्व पातळीवर बैठका सुरू आहेत असं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. देशभरातील चार हजार 123 निवडणूक नोंदणी अधिकारी, ईआरओ त्यांच्या विधानसभा मतदारसंघांमधील कोणत्याही प्रलंबित मतदान केंद्र पातळीवरील समस्या सोडवण्यासाठी सर्वपक्षीय बैठका घेत आहेत. सर्व 28 राज्ये आणि 8 केंद्रशासित प्रदेशांच्या सर्व 788 जिल्हा निवडणूक अधिकारी आणि 36 मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनाही कोणत्याही प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी अशा बैठका घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांच्या सक्रिय सहभागाने सुरू झालेल्या या बैठका 31 मार्चपर्यंत पूर्ण होतील.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**ज्ञानपीठ पुरस्कार**

छत्तीसगडमधले प्रसिद्ध हिंदी कवी आणि लेखक विनोद कुमार शुक्ल यांना यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला आहे. काल नवी दिल्लीत ही घोषणा करण्यात आली. त्यांच्या 50 पेक्षा जास्त वर्षांच्या साहित्यिक कारकिर्दीत त्यांनी कथा कविता बालसाहित्य अशा वेगवेगळ्या साहित्यात आपला ठसा उमटवला आहे. 'नौकर की कमीज', 'खिलेगा तो

देखेंगे' आणि 'दीवार में एक खिडकी रहती थी ' या त्यांच्या कादंबऱ्या आधुनिक हिन्दी साहित्यातल्या सर्वोत्कृष्ट कलाकृती मानल्या जातात.

**मणीपुर**

मणिपूरमधे शांतता आणि सौहार्द प्रस्थापित करण्याकरता तिथल्या लोकांनी एकत्र येऊन काम केलं पाहिजे, असं आवाहन न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं आहे. गवई यांच्या नेतृत्वाखाली सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांचं एक शिष्टमंडळ काल हिंसाचारग्रस्त मणिपूरच्या दौऱ्यावर गेलं होतं. गवई यांच्यासह न्यायमूर्ती विक्रम नाथ, एम एम सुंद्रेश आणि के व्ही विश्वनाथन यांनी चुराचांदपूर जिल्ह्यातल्या मदत छावणीला भेट दिली.

**फिल्मोत्सव**

जम्मू काश्मीरमध्ये, नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते आज जम्मूच्या अभिनव थिएटरमध्ये "तावी फिल्ममोत्सवाचं उद्धाटन होणार आहे. चित्रपट निर्माते, कलाकार आणि सर्जनशील व्यावसायिकांच्या प्रतिभेला व्यासपीठ देण्यासाठी जम्मू काश्मीर सिने असोसिएशननं हा लघुपट महोत्सव आयोजित केला आहे. उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देण्याबरोबरच सिनेमाच्या माध्यमातून जम्मू काश्मीरच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा प्रचार या निमित्ताने होणार आहे.

**हमास नेते ठार**

गाझामध्ये, खान युनिस इथे इस्त्रायली हवाई हल्ल्यात हमासचे राजकीय नेते सलाह अल-बर्दावील ठार झाले. हमास आणि पॅलेस्टिनी माध्यमांच्या वृत्तानुसार, दक्षिण गाझा पट्टीतील बर्दावील इथे हा हल्ला झाला, यामध्ये त्यांच्या पत्नीसह त्यांचा मृत्यु झाला. दरम्यान, काल सकाळपासून विविध ठिकाणी झालेल्या इस्त्रायली हवाई हल्ल्यात 32 पॅलेस्टिनी ठार झाले आहेत.

**अमेरिका**

अमेरिकेतल्या न्यू मेक्सिकोमध्ये लास क्रुसेस इथल्या उद्यानात दोन गटांमध्ये झालेल्या गोळीबारात 3 जण ठार तर 15 जण जखमी झाले आहेत. गोळीबारात मरण पावलेले तिघेही 20 वर्षांखालील युवक होते.

**क्रिकेट**

इंडियन प्रीमियर लीग, आयपीएल टी20 क्रिकेटच्या काल रात्री कोलकाता इथल्या ईडन गार्डन्सवर झालेल्या उद्घाटन सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू (आरसीबी) ने कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) चा 7 गडी राखून पराभव केला. केकेआर संघाने निर्धारित 20 षटकांत 8 बाद 174 धावा केल्या.

**जिम्नॅस्टिक्स**

जिम्नॅस्टिक्समध्ये, भारताच्या प्रणती नायकने तुर्कीतील अंताल्या इथे झालेल्या फेडरेशन इंटरनॅशनल डी जिम्नॅस्टिक (FIG) विश्वचषक स्पर्धेत महिलांच्या अंतिम सामन्यात कास्यपदक जिंकलं. आणि सरासरी 13.417 गुण मिळवत विश्वचषक स्पर्धांमध्ये आपलं स्थान प्रथमच निश्चित केलं. प्रणतीने आशियाई अजिंक्यपद पदक दोन वेळा जिंकलं

आहे.  अमेरिकेच्या जयला हॅंगने 13.66 गुणांसह सुवर्णपदक पटकावलं, तर अमेरिकेच्या क्लेअर पीसने 13.567 गुणांसह रौप्यपदक जिंकलं.

**खेलोइंडिया**

खेलो इंडिया पॅरा गेम्स 2025 च्या तिसऱ्या दिवशी काल  नवी दिल्लीतील डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज इथे झालेल्या नेमबाजी स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरनं सुवर्णपदक पटकावलं तर 10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात स्वरूप सोबत कविन केगनाळकरनं रौप्य पदक पटकवलं. ऑलिम्पिक पदक विजेता सुजांत कदमसह प्रेमकुमार आले, आरती पाटील यांनीही रौप्य पदक मिळवलं. महिला भालाफेकीत महाराष्ट्राच्या भाग्यश्री जाधवला सुवर्णपदक मिळालं. पुरुषांच्या 100 मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रणव देसाई आणि महिलांच्या थाळीफेक प्रकारात अक्कुताई उलभागट यांनी सुवर्णपदक पटकावलं. 400 मीटर धावण्याच्या प्रकारात नाशिकच्या दिलीप गावित यांना सुवर्णपदक मिळालं. महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 4 सुवर्ण पदकांसह 4 रौप्य पदकं पटकावली. काल दिवसअखेर, तामिळनाडू 19 सुवर्णपदकांसह पदकतालिकेत आघाडीवर असून हरियाणा राज्याने 14 सुवर्ण, राजस्थानने 11 आणि उत्तर प्रदेशने 10 सुवर्णपदकांची कमाई केली आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**